# विवेकानंद कॉलेज, कोल्हापूर

(अधिकारप्रदत्त स्वायत्त संस्था)

## समाजशास्त्र विभाग

## <u>Notice</u>

दिनांक - २५ / १० /२०२४

समाजशास्त्र विभागातील B.A.II च्या सर्व विद्यार्थ्यांना सूचित करण्यात येते कि शैक्षणिक वर्ष २०२४-२५ च्या पहिल्या सत्रातील अंतर्गत मूल्यमापनासाठी आवश्यक असणारे होमअसायमेंट दि.३०/१०/२०२४ पर्यंत जमा करावे.

प्रा. एस. व्ही. चामे

विभाग प्रमुख

HEAD
DEPARTMENT OF SOCIOLOGY
VIVEKANAND COLLEGE, KOLHAPUR
(EMPOWERED AUTONOMOUS)

VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR ESTD JUNE 1964 (Empowered Autonomous)

Scanned with OKEN Scanner

Shri Swami Vivekanand Shikshan Sanstha's

# VIVEKANAND COLLEGE, KOLHAPUR (EMPOWERED AUTONOMOUS)

2130, E Ward, Tarabai Park, Kolhapur, Maharashtra 416003

## Subject Wise Student Blank Marks Entry

**Session:** NEP 1.0 MAR - APR 2025

**Subject:** SOCIAL PROBLEMS IN CONTEMPORARY (DSC01SOC42)

**Stream:** B.A.

**Standard:** B.A. - SY

**Semester:** SEM - IV

**Print Date :** 06-04-2025

**Sub-Subject:** CIE

**Max Marks:** 10



| SrNo | PRN | SeatNo | GRNos | RollNo | Mob. No | StudentName | Marks |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2023014090 | 4101007 | 3007046 | 4402 | 7249666585 | KADAM AKANKSHA SANTOSH | 9 |
| 2 | 2023014138 | 4101009 | 3007225 | 4435 | 9270153070 | KHUTALE DIPALI KRISHNA | 9 |
| 3 | 2023014276 | 4101019 | 3006996 | 4461 | 9359714070 | SODAGE SHRUTIKA TATYASO | 9 |
| 4 | 2023014070 | 4101020 | 3006995 | 4420 | 6362464522 | GODASE SWARANJALI RAJESH | 9 |
| 5 | 2023014152 | 4101021 | 3007819 | 4438 | 9130389894 | KOLI SHREYA SANJAY | 10 |
| 6 | 2023014099 | 4101022 | 3010962 | 4526 | 7020529040 | KAMBLE ARYAN ANIL | 9 |
| 7 | 2023014162 | 4101044 | 3010909 | 4441 | 7757080852 | LAD NISHIGANDHA PINTU | 9 |
| 8 | 2023014119 | 4101053 | 3007489 | 4431 | 9975153953 | KAMBLE SHRUTI SACHIN | 9 |
| 9 | 2023014040 | 4101058 | 3008139 | 4412 | 9226874123 | DABHADE SHRADHA SANJAY | 9 |
| 10 | 2023014265 | 4101075 | 3006847 | 4553 | 9096397441 | SHELAKE SHRADHA RAJKUMAR | 9 |
| 11 | 2023014032 | 4101098 | 3006854 | 4409 | 9356462026 | CHOUGALE ARTI RAMCHANDRA | 10 |
| 12 | 2023014020 | 4101102 | 3007076 | 4408 | 7249449599 | BHOSALE SHRISHA SANDIP | 10 |
| 13 | 2023014035 | 4101144 | 3006873 | 4411 | 9011791708 | CHOUGALE POOJA RAMCHANDRA | 10 |
| 14 | 2023014057 | 4101135 | 3011330 | 4418 | 8625890487 | GAVADE AARTI BHIMRAO | 9 |

VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR * (Empowered Autonomous) * ESTD JUNE 1964

HEAD
DEPARTMENT OF SOCIOLOGY
VIVEKANAND COLLEGE, KOLHAPUR
(EMPOWERED AUTONOMOUS)

Scanned with OKEN Scanner

GoodLuck Page No.
Date

09/10

नाव :- आकांक्षा संतोष कदम
रोल नं :- 4402 / 4427
विषय :- समाजशास्त्र
B.A.-II (Sem-IV)

प्रश्न :- भ्रष्टाचाराची संकल्पना स्पष्ट करून उपाययोजना सविस्तर स्पष्ट करा.

→ भ्रष्टाचाराची संकल्पना :-

आधुनिक कालात भ्रष्टाचाराची गंभीर समस्या निर्माण झाली आहे. तरी प्राचीन कालात देखील भ्रष्टाचार होता. कौटिल्याच्या 'अर्थशास्त्र' या ग्रंथात तत्कालीन समाजात प्रचलित असलेल्या भ्रष्टाचाराच्या वेगवेगळ्या प्रकाराचे वर्णन आढळते.

भ्रष्टाचाराची समस्या ही जटिल आहे. तसेच भ्रष्टाचाराचे अनेक प्रकार आहेत. त्यामुळे भ्रष्टाचाराची व्याख्या करणे कठीण आहे. भ्रष्टाचार हा व्यक्तिगत किंवा सामूहिक प्रकारचा असतो. राजकारणी, अधिकारी, पोलिस त्याचप्रमाणे इतर व्यापारी, उद्योगपती इ. लोक व्यक्तिगत किंवा सामूहिक पद्धतीने भ्रष्टाचार करतात. पांढरपेशा गुन्हा देखील एक प्रकारचा भ्रष्टाचार होय. स्वतः किंवा कुटुंब, नातेवाईक किंवा मित्रांकरिता प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष रूपात कोणत्याही प्रकारचे आर्थिक वा अन्य भौतिक लाभ मिळवण्यासाठी भ्रष्टाचार ही साधारण पद्धती आहे. दैनंदिन जीवनात नेहमीच पद्धतीने आर्थिक किंवा इतर भौतिक लाभ प्राप्त केला जातो. परंतु वर्तमान कालात भ्रष्टाचारी स्पर्धा विषमतेमुळे वाईट मार्गाचे वेगवेगळे स्वरूप आढळून येते.

VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR (Empowered Autonomous) ESTD JUNE 1964


Scanned with OKEN Scanner

GoodLuck Page No.
Date

भ्रष्टाचारास आळा घालण्याच्या संदर्भात विविध विचारवंतांनी अनेक उपाय सुचविले आहेत. त्यापैकी काही प्रमुख उपाय पुढीलप्रमाणे :-

1] आदर्श शिक्षणाचा प्रसार :-

भ्रष्टाचार रोखण्याकरिता शिक्षण व्यवस्थेमध्ये विशेष सुधारणा होण्याची आवश्यकता आहे. शिक्षण केवळ सैद्धांतिकच नव्हे तर व्यावहारिक देखील असले पाहिजे. नैतिक आणि आदर्श शिक्षणावर विशेष भर दिला पाहिजे. शिक्षकांनी विद्यार्थ्यांसमोर असा आदर्श ठेवला पाहिजे की, ज्यामुळे विद्यार्थी भ्रष्टाचाराचे निर्मूलन करण्याच्या दृष्टीने विशेष प्रयत्न करतील.

2] राजकीय पक्षांचा नैतिक स्तर उंचावणे :-

भारतात लोकशाही शासनपद्धतीचा स्विकार करण्यात आला आहे. लोकशाही व्यवस्थेमध्ये भ्रष्टाचाराच्या निर्मूलनाची जबाबदारी ही प्रामुख्याने राजकीय पक्षांवर असते. जर देशातील राजकीय पक्षांचा नैतिक स्तर वाढला तर भ्रष्टाचारच राहणार नाही. निवडणुकीत भ्रष्ट मार्गाचा अवलंब करण्यात येऊ नये.

3] व्यापार आणि उद्योग क्षेत्रात कायदे कठोरपणे लागू करणे :-

आर्थिक क्षेत्रातील भ्रष्टाचार थांबविण्यासाठी कायदे कठोरपणे लागू करणे आवश्यक आहे. पैशाची रिश्वत घेणाऱ्याविरुद्ध कठोर कारवाई करण्यात यावी. विशेषतः काळा बाजार, नकली औषधे विकणे, औद्योगिक नियमांचे पालन न करणे इत्यादींच्या विरुद्ध जोपर्यंत कडक कारवाई होत नाही, तोपर्यंत भ्रष्टाचार दूर होणार नाही. भ्रष्टाचार करणाऱ्यांना कठोर शिक्षा व्हावी. ज्यामुळे इतर कोणतीही व्यक्ती भ्रष्टाचार करण्याचे धाडस करणार नाही.

VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR ESTD. JUNE 1964 (Empowered Autonomous)



Scanned with OKEN Scanner

GoodLuck Page No.
Date

4) शासकीय कार्यात सुधारणा :-

प्रशासकीय कार्यातील भ्रष्टाचार दूर करण्यासाठी, कर्मचाऱ्यांच्या वेतनामध्ये वाढ करणे आवश्यक आहे. पैशाची अफरातफर करणे, रिश्वत फसवणूक इ. गोष्टींवर कठोर प्रतिबंध लावण्यात होता. सरकारी कार्यालयात भ्रष्टाचार होत असल्यास अधिकाऱ्यांनी संबंधित कर्मचाऱ्यांच्या विरुद्ध कठोर कारवाई करावी.

5) पोलिस विभागात सुधारणा :-

पोलिस विभागात सुधारणा करणे आवश्यक आहे. सुशिक्षित व्यक्तींना पोलिसात भरती होण्यासाठी प्रोत्साहन द्यावे. लोकांची सेवा करणे हे पोलिसांचे कर्तव्य आहे. भ्रष्टाचार करणाऱ्यांवर कारवाई करावी. अशा प्रकारची शिक्षण पोलिसांना देण्यात यावे. पोलिसांच्या वेतन आणि भत्त्यात पुरेशी वृद्धी करण्यात यावी. पोलिस अधिकाऱ्यांच्या विरुद्ध लोकांनी तक्रारी केल्यास, त्यावर योग्य विचार करून भ्रष्ट पोलिस अधिकाऱ्यांविरुद्ध कारवाई करण्यात यावी.

6) न्यायालय क्षेत्रात सुधारणा :-

लोकांना कमी वेळात आणि पैशात न्याय मिळेल अशा प्रकारची न्यायव्यवस्था असली पाहिजे. ज्या केसेस बऱ्याच दिवसांपासून पडून आहेत त्या केसेसचा लवकर निकाल लावण्यात यावा. कारण कोर्टात केसेस बरच काळापर्यंत पडून राहिल्यास लोकांच्या अधिक पैसा खर्च होतो. तसेच रिश्वत देण्यास लोक मजबूर होतात. जे न्यायाधीश, कारकून किंवा कर्मचारी रिश्वत घेत असतील, अशांवर कठोर कारवाई केली पाहिजे.

VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR ESTD JUNE 1964 (Empowered Autonomous)

7) भ्रष्टाचाऱ्यास कठोर शिक्षा :-

भ्रष्टाचार करणाऱ्या भ्रष्टाचारी व्यक्तीस कठोर शिक्षा देण्यात यावी. पांढरपेशी गुन्हेगार कायद्यातून सहजपणे सुटतात. म्हणून पांढरपेशी गुन्ह्यांच्या संदर्भात विशेष कायदे करण्यात यावे. भ्रष्टाचारी लोकांना

Goodluck

Scanned with OKEN Scanner

कडक शिक्षा मिळणे आवश्यक आहे. जे कर्मचारी भ्रष्टाचारी असतात. त्यांची फक्त बदली केली जाते.

8) भ्रष्टाचार विरोधी संघटनांची स्थापना :-

भ्रष्टाचाराचे निर्मूलन करण्याच्या दृष्टीने भ्रष्टाचार विरोधी संघटनांची स्थापना करण्यात यावी. प्रत्येक गावात, शहरात आणि क्षेत्रात भ्रष्टाचारविरोधी संघटना निर्माण करण्यास प्रोत्साहन दिले पाहिजे. आणि या संघटनांनी प्रभावीपणे भ्रष्टाचार विरोधी आंदोलन उभारावे.

VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR (Empowered Autonomous) ESTD JUNE 1964


Scanned with OKEN Scanner

09/10

PAGE NO.:
DATE: / /

नाव :- श्रद्धा राजकुमार शेळके
विषय : समाजशास्त्र
[समकालीन भारतातील सामाजिक समस्या]
वर्ग : BA-II रोल नं. :- 4553

# भ्रष्टाचाराची संकल्पना स्पष्ट करून त्यावर उपाययोजना स्पष्ट करा.

→ भ्रष्टाचाराची संकल्पना :

आधुनिक काळात राजकीय, शासकीय, शैक्षणिक, सामाजिक, धार्मिक, इ. सर्वच क्षेत्रात भ्रष्टाचार आढळतो. ज्या क्षेत्रात भ्रष्टाचार नाही, असे कोणतेही क्षेत्र नाही. भ्रष्टाचाराचा रोग हा प्रत्येक क्षेत्राला लागला आहे. स्वार्थीभावना, व्यक्तिवाद, भौतिकवादी विचारसरणी आणि सामाजिक व नैतिक नियंत्रणाचा अभाव इ. कारणांमुळे देशात सर्वत्र भ्रष्टाचार सुरु आहे, म्हणून भ्रष्टाचाराची एक ज्वलंत समस्या निर्माण झाली आहे. काळा पैसा या भ्रष्टाचारातून निर्माण केला जातो. व्यापारी, उद्योगपती, अधिकारी, राजकीय मंडळी इ. सर्वच लोक भ्रष्टाचार करतात आणि त्या भ्रष्टाचारातून काळा पैसा मिळवितात. काळ्या पैश्याच्या आधारावरच लोक विलासी व चैनीचे जीवन जगतात. आधुनिक काळात आपल्या देशात ज्वलंत समस्या निर्माण झाली आहे.

आधुनिक काळात भ्रष्टाचाराची समस्या निर्माण झाली असली तरी, प्राचीन काळात देखील भ्रष्टाचार होता. कौटिल्याच्या 'अर्थशास्त्र' या ग्रंथात तत्कालीन समाजात प्रचलित असलेल्या भ्रष्टाचाराच्या वेगवेगळ्या प्रकारचे वर्णन आढळते. परंतु प्राचीन काळात भ्रष्टाचाराची समस्या निर्माण झाली नव्हती. कारण त्या काळात राजाच्या कार्याचे क्षेत्र हे मर्यादित होते. तसेच देवाण-घेवाणीच्या तरल साधनांचा अभाव होता. म्हणून भ्रष्टाचार करण्यास विशेष संधी नव्हती. विशेष म्हणजे सामाजिक आणि नैतिक नियंत्रणाचा लोकांवर प्रभाव होता. त्यामुळे प्राचीन व मध्ययुगीन काळात भ्रष्टाचाराचे क्षेत्र हे अत्यंत सीमित होते.

COLLEGE KOLHAPUR JUNE 1964 Empowered Autonomous

भारतात भ्रष्टाचाराची वृद्धी ही प्रामुख्याने स्वातंत्र्योत्तर काळात झाली आहे. आज देशातील लोकशाही सरकारचे नवे स्वरूप आणि सरकारी कार्याच्या विस्तारामुळे विविध प्रकारच्या प्रोत्साहन मिळाले आहे. त्यामुळे खेड्यापासून तर शहरापर्यंत सर्वत्र भ्रष्टाचार आढळून येतो. भ्रष्टाचाराची समस्या ही जटिल आहे. तसेच भ्रष्टाचाराचे अनेक प्रकार आहेत. त्यामुळे भ्रष्टाचाराची व्याख्या

NEW A.B.S
Scanned with OKEN Scanner

करणे कठीण आहे. भ्रष्टाचार हा व्यक्तिगत किंवा सामूहिक प्रकारचा असतो. राजकारणी, अधिकारी, पोलिस त्याचप्रमाणे इतर व्यापारी, उद्योगपती इ. लोक व्यक्तिगत किंवा सामूहिक पद्धतीने भ्रष्टाचार करतात. पांढरपेशी गुन्हा देखील एक प्रकारचा भ्रष्टाचार होय. स्वतः किंवा कुटुंब, नातेवाईक किंवा मित्रांकरिता प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष रुपात कोणत्याही प्रकारचे आर्थिक वा अन्य भौतिक लाभ मिळविण्यासाठी भ्रष्टाचार ही एक साधारण पद्धती आहे. दैनंदिन जीवनात नेहमीच या पद्धतीने आर्थिक किंवा इतर भौतिक लाभ प्राप्त केला जातो. परंतु वर्तमान काळात असणारी स्पर्धा आणि विषमतेमुळे वाईट मार्गाचे वेगवेगळे स्वरुप आढळून येते.

## भ्रष्टाचार रोखण्याचे उपाय :

आज देशातील भ्रष्टाचार रोखण्याची नितांत आवश्यक आहे. कारण सर्वच क्षेत्रात भ्रष्टाचाराचा प्रादुर्भाव झाला आहे. राजकीय, प्रशासकीय, आर्थिक, सामाजिक, धार्मिक, इ. सर्वच क्षेत्रात प्रचंड प्रमाणात भ्रष्टाचार फोफावला आहे. संपूर्ण समाजाला भ्रष्टाचाराचा रोग झाला आहे. दिवसेंदिवस भ्रष्टाचाराचे प्रमाण वाढत आहे. त्यामुळे भ्रष्टाचारास आळा घालणे आवश्यक आहे. हे लक्षात घेऊन सरकारने काही प्रयत्न केले आहेत.

दुसऱ्या महायुद्धाच्या दरम्यान असे निदर्शनास आले की, सरकारी आणि गैरसरकारी लोक जनतेच्या पैशांवर स्वतः श्रीमंत बनण्याचा प्रयत्न करतात. म्हणून अशा भ्रष्ट लोकांना दंड देण्याच्या उद्देशाने 1941 मध्ये "विशिष्ट पोलिस विभाग" (Special Police Establishement) नावाचा विभाग स्थापन करण्यात आला. तर मार्च 1947 मध्ये कारवाई प्रभावीपणे करण्यासाठी "भ्रष्टाचार निवारण कायदा" पारीत करण्यात आला. या कायद्याच्या कार्यपद्धतीचे अध्ययन करण्याच्या उद्देशाने 1953 मध्ये 'बक्षी टेकचंद समिती' स्थापन करण्यात आली होती. या समितीने या कायद्यात काही सुधारणा केले. सरकारी कामकाजावरील विस्तारावर कडक नजर ठेवण्याकरिता गृहमंत्रालयाने ऑगस्ट 1955 मध्ये "प्रशासन दक्षता विभाग" सुरु केला. त्याचबरोबर वेगवेगळ्या मंत्रालयात आणि विभागात दक्षता कक्ष स्थापन करण्यात आलेत. मंत्रालय किंवा विभागाच्या विभिन्न एककांना आवश्यक प्रेरणा, निर्देश आणि सहकार्य प्रदान करणे हा दक्षता विभागाचा उद्देश आहे. या विषयाचे अध्ययन करण्याच्या संदर्भात "विवियन बोस आयोग" ची नियुक्ती Dec 1956 मध्ये करण्यात आली होती.

त्यानंतर 1964 मध्ये भ्रष्टाचार निवारण समितीने अधिक व्यापक आणि स्पष्ट अधिकार असलेल्या केंद्रिय दक्षता आयोगाची स्थापना करण्याचे सुचविले. ज्यामुळे हे आयोग अशा आरोपांच्या संदर्भात अधिक कुशलतापूर्वक कार्य करु शकेल. नंतर भ्रष्टाचारास आळा घालण्याच्या संदर्भात विविध विचारवंतांनी अनेक उपाय सुचविले आहेत. त्यापैकी काही प्रमुख उपाय पुढीलप्रमाणे आहेत:

i) **आदर्श शिक्षणाचा प्रसार :**

भ्रष्टाचार रोखण्याकरिता शिक्षण व्यवस्थेमध्ये विशेष सुधारणा होण्याची आवश्यकता आहे. शिक्षण केवळ सैद्धांतिकच नव्हे तर व्यवहारिक देखील असले पाहिजे. नैतिक आणि आदर्श शिक्षणावर विशेष भर दिला पाहिजे. शिक्षकांनी विद्यार्थ्यांसमोर असा आदर्श ठेवला पाहिजे की, ज्यामुळे विद्यार्थी भ्रष्टाचाराचे निर्मूलन करण्याच्या दृष्टीने विशेष प्रयत्न करतील.

ii) **राजकीय पक्षांचा नैतिक स्तर उंचविणे :**

भारतात लोकशाही शासनपद्धतीचा स्वीकार करण्यात आला आहे. लोकशाही व्यवस्थेमध्ये भ्रष्टाचाराच्या निर्मूलनाची जबाबदारी ही प्रामुख्याने राजकीय पक्षांवर असते. जर देशातील राजकीय पक्षाचा नैतिक स्तर वाढला तर भ्रष्टाचार राहणार नाही. निवडणुकीत भ्रष्ट मार्गांचा अवलंब करण्यात येऊ नये. प्रत्येक राजकीय पक्षाने प्रामाणिक आणि कर्तव्यनिष्ठ व्यक्तीस तिकीट द्यावे. परंतु हे तेव्हाच शक्य आहे; जेव्हा राजकीय पक्षाचा स्तर हा उंचावल्या जाईल.

COLLEGE KOLHAPUR ESTD JUNE 1964 (Empowered Autonomous)

iii) **व्यापार आणि उद्योग क्षेत्रात कायदे कठोरपणे लागू करणे :**

आर्थिक क्षेत्रातील भ्रष्टाचार थांबवण्यासाठी कायदे कठोरपणे लागू करणे आवश्यक आहे. रिश्वत घेण्याविरुद्ध कारवाई करण्यात यावी. भेसळ, काळा बाजार, नकली औषध विक्री, औद्योगिक नियमांचे पालन न करणे इ. विरुद्ध जोपर्यंत कडक कारवाई होत नाही, तोपर्यंत भ्रष्टाचार दूर होणार नाही. भ्रष्टाचार करणाऱ्यांना कठोर शिक्षा व्हावी. ज्यामुळे इतर कोणतीही व्यक्ती भ्रष्टाचार करण्याचे धाडस करणार नाही.

iv) **शासकीय कार्यात सुधारणा :**

प्रशासकीय कार्यातील भ्रष्टाचार दूर करण्यासाठी कर्मचाऱ्यांच्या वेतनामध्ये वाढ करणे आवश्यक आहे. पैशाची

NEW A.B.S
Scanned with OKEN Scanner

PAGE NO.:
DATE: / /

अफरातफर करणे, रिश्वत, फसवणूक, इ. गोष्टिंवर कठोर प्रतिबंध लावण्यात यावा. सरकारी कार्यालयात भ्रष्टाचार होत असल्यास अधिकाऱ्यांनी संबंधित कर्मचाऱ्यांच्या विरुद्ध कठोर कारवाई करावी

v) पोलिस विभागात सुधारणा :
पोलिस विभागात सुधारणा करणे आवश्यक आहे. सुशिक्षित व्यक्तिंना पोलिसात भरती होण्यासाठी प्रोत्साहन द्यावे. लोकांची सेवा करणे हे पोलीसांचे कर्तव्य आहे. भ्रष्टाचार करणाऱ्यांवर कारवाई करावी. अशा प्रकारचे शिक्षण पोलिसांना देण्यात यावे. पोलीसांच्या वेतन आणि भत्त्यात पुरेशी वृद्धी करण्यात यावी. पोलिस अधिकाऱ्यांच्या विरुद्ध लोकांनी तक्रारी केल्यास, त्यावर योग्य विचार करुन भ्रष्ट पोलिस अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यात यावी. राजकीय नेते पोलीस अधिकाऱ्यांवर अनुचित दबाव टाकणार नाही. याची काळजी घेणे आवश्यक आहे.

vi) न्यायालय क्षेत्रात सुधारणा :
लोकांना कमी वेळात आणि कमी पैशात न्याय मिळेल अशा प्रकारची न्यायव्यवस्था असली पाहिजे. ज्या केसेस बऱ्याच दिवसांपासून पडून आहेत. त्या केसेसचा लवकर निकाल लावण्यात यावा. कारण कोर्टात केसेस बराच काळापर्यंत पडून राहिल्यास लोकांचा अधिक पैसा खर्च होतो. तसेच रिश्वत देण्यास लोक मजबुर होतात. जे न्यायाधीश, कारकून, चपराशी रिश्वत घेत असतील अशांवर कठोर कारवाई केली पाहिजे. न्याय देताना कोणताही पक्षपात करता कामा नये. यावर विशेष भर देण्याची आवश्यकता आहे.

vii) भ्रष्टाचार विरोधी संघटनांची स्थापना :
भ्रष्टाचाराचे निर्मुलन करण्याच्या दृष्टिने भ्रष्टाचार विरोधी संघटनांनी स्थापन करण्यात यावी. प्रत्येक गावात, शहरात आणि राज्यात भ्रष्टाचारविरोधी संघटना निर्माण करण्यास प्रोत्साहन दिले पाहिजे आणि या संघटनांनी प्रभावीपणे भ्रष्टाचार विरोधी आंदोलन उभारावे. समाजसेवक आण्णा हजारे यांनी समाजसेवी संस्थामार्फत भ्रष्टाचार निर्मूलनाचा एक चांगला आदर्श घालून दिला आहे.

ESTD JUNE 1964 KOLHAPUR Autonomous



Scanned with OKEN Scanner